# किरकोळ दिवाणी अर्ज ०१/२०१८ मधील निशाणी ०१ खालील आदेश

**(CNR No. MHGA07-000009-2018)**

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन VIII १८२७ चे क्लॉज ३ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेकरिता दाखल केला.

०२. अर्जदारांचे कथनानुसार **मयत अशोक गणपत कन्नाके** हा **दिनांक २७/११/२०१७** रोजी मरण पावला. अर्जदार क्रमांक ०१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्रमांक ०२ व ०३ मयताचे मुले आहेत. मयतास अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही वारसदार नाही व त्यांनी आपल्या हयातीत वसियत बनवून ठेवलेली नाही. **मयत अशोक गणपत कन्नाके** य हे जिवंत असतांना मौजा–कोटमी, तालुका–एटापल्ली येथे ग्रामसेवक या पदावर कार्यरत होते. अर्जदारांना त्यांचे पश्चात अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याबाबत व पेन्शन मिळण्याकरिता त्यांनी संबंधीत अधिकाऱ्याशी संपर्क केला असता सदर अधिकाऱ्याने त्यांना न्यायालयाचे उत्तराधिकार प्रमाणपत्र दाखल करण्याची तोंडी सुचना केल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०३. अर्ज दाखल झाल्यानंतर तहसिल कार्यालय, अहेरी, नगर पंचायत कार्यालय, अहेरी व दिवाणी न्यायालय, अहेरी यांचे नोटीस बोर्डवर जाहिरनामा (नि.०६) प्रसिध्द करण्यात आला. त्याचप्रमाणे दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२/०१/२०१८ रोजी हरकती मागविणारी जाहिरनामा नोटीस (नि.१३) प्रसिध्द करण्यात आली. परंतु विहीत कालावधीत कोणीही न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदविलेली नाही.

०४. अर्जदार क्रमांक ०१ ने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.०९) अन्वये दाखल केले. सदरच्या प्रतिज्ञापत्रात अर्जदार क्रमांक ०१ ने अर्जातील मजकुराची शपथेवर पुर्नरावृत्ती केली. अर्जदारांनी अभिलेखावर **मयत अशोक गणपत कन्नाके** याचा मृत्युचा दाखला (नि.

१०), नगर सेवक नगर पंचायत, अहेरी, तालुका अहेरी यांनी दिलेला वारसांचा दाखला (नि.११) अर्जदार क्रमांक ०१ चे आधारकार्डची पडताळलेली प्रत (नि.१२) व दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२/०१/२०१८ रोजी दिलेली जाहिर नोटीस तसेच त्या संबंधी बिल (नि. १३ व १४) इत्यादी लेखी पुरावा दाखल केला.

०५. अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे काळजीपुर्वक वाचन केले असता असे दिसून येते की, **मयत अशोक गणपत कन्नाके** हा **दिनांक २७/११/२०१७** रोजी मरण पावला. अर्जदार क्रमांक ०१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे मयताचे मुले असून वर्ग–१ मधील कायदेशिर वारसदार आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हिचे प्रतिज्ञापत्र काळजीपुर्वक बघीतले असता मयतास त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारसदार असल्याचे दिसून येत नाही. अर्जदारांना मयताचे मृत्यु पश्चात अनुकंपा तत्वावर नोकरी व मयताची पेन्शन मिळण्याकरिता उत्तराधिकार प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदर प्रमाणपत्र अर्जदार यांचे नांवे निर्गमित करण्यास कोणतीही हरकत अथवा अडथळा दिसून येत नाही. प्रस्तुत प्रकरणी जाहिर हरकती मागवून सुध्दा कोणीही हरकत उपस्थित न केल्याने व अर्जदार यांनी तोंडी व लेखी पुराव्याच्या आधारे अर्जातील कथने प्रस्थापित केल्याने प्रस्तुत अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. अर्जदार क्रमांक ०१ श्रीमती वनमाला अशोक कन्नाके, क्रमांक ०२ शुभम अशोक कन्नाके व क्रमांक ०३ गायत्री अशोक कन्नाके यांचे नावे उत्तराधिकार प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

०३. प्रस्तुत उत्तराधिकार प्रमाणपत्र अर्जदारांना मयताची पेन्शन मिळण्याकरिता व अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याकरिता निर्गमित करण्यात येते. अर्जदारांना सदरील उत्तराधिकार प्रमाणपत्र इतर कोणत्याही चल अथवा अचल मिळकतीकरित वापरावयाचे झाल्यास न्यायालयास त्याबाबत कळवून आवश्यक तो न्यायालयीन मुद्रांक जमा करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

०४. अर्जदारांचे नावे उत्तराधिकार प्रमाणपत्र निर्गमित करतेवेळी त्यावर उपरोक्त शर्त क्र. ०३ चा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

दिनांक :– १०/०४/२०१८
स्थळ :– अहेरी

**श्री. एस.एस. महाले,**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अहेरी.

## किरकोळ दिवाणी अर्ज ०१/२०१८ मधील निशाणी ०१ खालील आदेश

**(CNR No. MHGA07-000009-2018)**

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन VIII, १८२७ चे क्लॉज ३ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे कथनानुसार **मयत अशोक गणपत कन्नाके** हे **दिनांक २७/११/२०१७** रोजी मरण पावले. अर्जदार क्र.१ ह्या मयताच्या पत्नी असून अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हा मयताचे मुले आहेत. मयतास अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही वारसदार नाही व त्यांनी आपल्या हयातीत वसियत बनवून ठेवलेली नाही. **मयत अशोक गणपत कन्नाके** हे जिवंत असतांना मौजा—कोटमी, तालुका—एटापल्ली जिल्हा—गडचिरोली येथे ग्रामसेवक या पदावर नोकरी करीत होते. सदर विभागात अनुकंपा तत्वावर अर्जदारांना नोकरी मिळण्याकरीता व मयताची पेंशन मिळण्याकरिता अर्जदारांनी संबंधीत अधिकाऱ्याशी संपर्क केला असता सदर अधिकाऱ्याने त्यांना न्यायालयाचे उत्तराधिकार प्रमाणपत्र दाखल करण्याची तोंडी सुचना केल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०३. अर्ज दाखल झाल्यानंतर तहसिल कार्यालय, अहेरी नगरपंचायत कार्यालय, अहेरी व दिवाणी न्यायालय, अहेरी यांचे नोटीस बोर्डवर जाहिरनामा (नि.०६) प्रसिध्द करण्यात आला. त्याचप्रमाणे दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२/०१/२०१८ रोजी हरकती मागविणारी जाहिरनामा नोटीस (नि.१३) प्रसिध्द करण्यात आली. परंतु विहीत कालावधीत कोणीही न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदविलेली नाही.

०४. अर्जदार क्रमांक ०१ ने स्वत:चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.०९) अन्वये दाखल केले. सदरच्या प्रतिज्ञापत्रात अर्जदार क्रमांक ०१ ने अर्जातील मजकुराची शपथेवर पुर्नरावृत्ती केली. अर्जदारांनी अभिलेखावर **मयत अशोक गणपत कन्नाके** याचा मृत्युचा दाखला (नि. १०), नगर सेवक, नगर पंचायत, अहेरी यांनी दिलेले वारसांचे दाखले (नि.११), अर्जदाराचे आधारकाडाची पडताळलेली प्रत (नि.१२) व दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२/०१/२०१८ रोजी दिलेली जाहिर नोटीस तसेच त्या संबंधी बिल (नि.१३ व १४) इत्यादी लेखी पुरावा दाखल केला.

०५. अर्जदारांनी दाखल केलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे काळजीपुर्वक वाचन केले असता **मयत अशोक गणपत कन्नाके** हे **दिनांक २७/११/२०१७** रोजी मरण पावल्याचे दिसून येते. अर्जदार क्रमांक ०१ ह्या मयताच्या पत्नी असून अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे मयताचे मुले असून कायदेशिर वारसदार आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हिचे शपथपत्र त्यांचे व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशिर वारसदार असल्याचे दर्शवित नाही. अर्जदारांना मयताचे मृत्यु पश्चात अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याकरिता व मयताची पेंशन मिळण्याकरिता उत्तराधिकार प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदर प्रमाणपत्र अर्जदार यांचे नांवे निर्गमित करण्यास कोणतीही हरकत अथवा अडथळा दिसून येत नाही. प्रस्तुत प्रकरणी जाहिर हरकती मागवून सुध्दा कोणीही हरकत उपस्थित न केल्याने व अर्जदार यांनी तोंडी व लेखी पुराव्याच्या आधारे अर्जातील कथने प्रस्थापित केल्याने प्रस्तुत अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. अर्जदार क्रमांक ०१ श्रीमती वनमाला अशोक कन्नाके, अर्जदार क्रमांक ०२ शुभम अशोक कन्नाके व क्रमांक ०३ कु. गायत्री अशोक कन्नाके हे **मयत अशोक गणपत कन्नाके** याचे वारस असल्याने त्यांना उत्तराधिकार प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

०३. प्रस्तुत उत्तराधिकार प्रमाणपत्र अर्जदारांना मौजा–कोटमी, तालुका–एटापल्ली, जिल्हा–गडचिरोली येथे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याकरिता व मयताची पेंशन मिळण्याकरिता निर्गमित करण्यात येते. अर्जदारांना सदरील उत्तराधिकार

प्रमाणपत्र इतर कोणत्याही चल अथवा अचल मिळकतीकरित वापरावयाचे झाल्यास न्यायालयास त्याबाबत कळवून आवश्यक तो न्यायालयीन मुद्रांक जमा करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

०४. अर्जदारांचे नावे उत्तराधिकार प्रमाणपत्र निर्गमित करतेवेळी त्यावर उपरोक्त शर्त क्र. ०३ चा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

दिनांक :– १०/०४/२०१८
स्थळ :– अहेरी

**श्री. एस.एस.महाले,**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अहेरी